नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १६/०८/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील क्रिस्टल कंपनी समोर एमआयडीसी बोरी येथे दिनांक १४/०८/२२ चे २१.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– स्वप्नील रमेश दुपारे वय २७ वर्ष, रा. भालेवाडी पोस्ट. जुनापानी ता.कारंजा जि.वर्धा, ह.मु बेली कंपनी हे त्यांचे मित्राची एम.एच–३४/ए.झेड–६४४३ क्रमांकाची मोअरसायकलने जात असता मोटरसायकल फिर्यादीचा मित्र नामे– प्रवीन तेजराम श्रीरामे हा चालवित होता. त्यादरम्यान आरोपी वाहन चालकाने आपले एम.एच–३६/एफ–०११३ क्रमांकाचा ट्रक अचानक वळविल्याने ट्रकचा मागील भाग मोटसायकला लागला. त्यामुळे मोटरसायकलचे संतुलन बिघडल्याने मोटरसायकल हि ट्रकचे पाठिमागिल चाकामध्ये आली. या अपघातात प्रवीन तेजराम श्रीरामे(मृतक), वय ३५ वर्ष, रा. सोनेगाव बेगडे ता.चिमुर जि.चंद्रपुर ह. मु. बेली कंपनी एमआयडीसी बोरी हा जखमी होवुन डोक्याला मार लागल्याने व डोक्यातुन व काना मधुन रक्तस्त्राव जास्त झाल्यान तो घटणास्थळीच मरण पावल. फिर्यादी याच्या किरकोळ जखमी होण्यास आरोपी कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९,३३७,३०४(अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री रामेश्वर राय मो.क्र. ९९२३४२४७६७ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा वार्ड क्र १७ गजानन मंदीरमागे कळमेश्वर येथे दि. १५/०८/२०२२ चे ०४.०० वा. सुमारास **सौ.आरती अतुल मांडवकर (मृतक), वय २२ वर्ष, रा. वार्ड क्र. १७ गजानन मंदीरमागे कळमेश्वर** हिचे लग्न दि. १०/०४/२०२२ रोजी फिर्यादी नामे– अतुल अशोकराव मांडवकर, वय २८ वर्ष, रा. वार्ड क्र. १७, गजानन मंदीरमागे कळमेश्वर यांचे सोबत रितीरीवाजाने झाले. आरती मांडवकर हिने परिवारासह घरी पाणीपुरी खाल्ली त्यामुळे तिला मळमळ होवुन चक्कर आली. त्यामुळे तिची अचानक प्रकृती खराब झाली. फिर्यादीने तिला संजीवनी हॉस्पीटल कळमेश्वर येथे भरती केल्याने तेथे उपचार करून तिला नागपुरला रेफर केल्याने विन्स हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोशित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सपोनि श्री मेश्राम मो.क्र. ९०७५२४५०५९ हे करीत आहे.

२) पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत मौजा वार्ड क्र. १ पाटणसावंगी येथे १४/०८/२२ चे १४.०० वा. सुमारास **अनिल हरीचंद्र खडांते (मृतक), वय ४५ वर्ष रा. वार्ड क्र. १ पाटनसावंगी** याने स्वताचे राहते घरी दारुच्या नशेमध्ये असता तो खाली पडल्याने त्याच्या उजव्या पायाला दावाजाचे टिन लागले. त्याला उपचाराकरीता प्रथम ग्रामीण रुग्णालय पाटणसावंगी व नंतर मेयो हॉस्पीटल मध्ये भरती केले असता उपचारादम्यान दि. १४/०८/२०२२ चे २३.३० वा. डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक सुनिल नाचनकर पो.स्टे. सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार संदिप नागरे मो.क्र. ९८२२४८६५८४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर